सामना

# केळवे माहीमच्या १७ गावांना मिळणार शुद्ध पाणी

## ■ जलजीवन मिशनद्वारे फिल्टर पाणी पुरवा ■ जिल्हा परिषद अध्यक्षांचे निर्देश

पालघर, दि. ६ (प्रतिनिधी) – केळवे-माहीममधील १७ गावांना लवकरच शुद्ध पाणी मिळणार आहे. जिल्हा परिषद अध्यक्षा वैदेही वाढाण यांनी येथील पाणी योजनांची पाहणी करून या सर्व गावांना जलजीवन मिशनद्वारे शुद्ध पाणी पुरवा असे निर्देश अधिकाऱ्यांना दिले.



माहीम ग्रामपंचायतीमधील काही भागात नळाद्वारे गढूळ पाणी येत असल्याच्या तक्रारी गावकऱ्यांनी केल्या. त्यानंतर जिल्हा परिषद अध्यक्षा वैदेही वाढाण यांनी गावात जाऊन पाहणी केली व ग्रामस्थांच्या समस्या समजावून घेतल्या. जिल्हा परिषद अध्यक्षांनी झांझरोळी येथील धरणावरील केळवे, माहीमच्या १७ गाव नळ पाणी पुरवठा योजनेचीही पाहणी केली.

ही पाणी योजना नाविन्यपूर्ण करण्याची कार्यवाही सुरू असून पावसामुळे गढूळ पाणी येत आहे. परंतु या प्रस्तावित पाणी योजनेत जलशुद्धीकरण केंद्र असून यापुढे गढूळ पाणी येणार नाही अशी ग्वाही पाणीपुरवठा अधिकाऱ्यांनी यावेळी दिली. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख राजेश शहा, महिला व बालकल्याण माजी सभापती नमिता राऊत, जिल्हा परिषद सदस्य सीमा रावते, करिष्मा उमतोल, डॉ. वैशाली करबट, रामदास पाटील, कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा जी.पी. निखडुंगे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे उपअभियंता नरेश पाटील व अधिकारी यावेळी उपस्थित होते. सफाळे, कांद्रेभुरे येथील शाळा व बंदाटे येथील उपकेंद्रासही वाढाण यांनी भेट देऊन समस्या जाणून घेतल्या.

Mumbai Edition
Aug 7, 2021 Page No. 6
Powered by : eReleGo.com